THE WIND
Helping HAND for Community
Bulletin of Rotary Club of Pune Westend
Vol. 23 | Issue 6 | December 2021
Rotary Club of Pune Westend 1999
RID 3131, Club No. 52038
SERVE TO CHANGE LIVES
Rotary

Editor : Rtn. Arati Gokhale, Cell No.8007944233
email : acgokhale65@gmail.com
President : Rtn. Shailesh Nandurkar, Cell No. 9823054520
Secretary : Rahul Awasthee, Cell No. 9665030301

## Editorial


Rtn. Arati Gokhale

After a wonderful and mesmerising 'Diwali Pahaat' we had a commendable project. 'The Rising Star'.

Congratulations President Shailesh and the team!

December is 'The Disease Prevention and Treatment' month. We have already been working in this area by distributing medical kits and solar lamps to the needy.

We need more funds for more charity. So, how much should one donate? I believe, it is not about the amount but it is about the willingness to give. Charity has always enriched us.

Sharing a beautiful story about Bill Gates, a billionaire and a philanthropist. He was asked 'who the richest man he had met so far was.' To this he answered 'it was a newspaper vendor at the New York airport.'

During his struggling days, Bill Gates was travelling & on reaching New York he wanted to buy a newspaper but had no money. The newspaper vendor was sympathetic and offered him a free newspaper. This happened twice. Time flew; Bill Gates was now super rich. He remembered the newspaper vendor and wanted to meet him to repay his gratitude. On meeting, the vendor refused to take any money and laughed saying "Sir, you are repaying me as you are rich now and can afford, but I gave you when I had nothing." How can you repay this gratitude. Bill Gates was touched and thought, he who does not have enough but still shares has a heart of gold and is truly rich.

No one has ever become poor by giving, as Charity has always enriched us.

So friends do share and be a help!

## Monthly Program for December 2021

**रविवार ५ डिसेंबर**
मॉर्निंग टेकडी वॉक – तळजाई

**शुक्रवार १० डिसेंबर**
नॉमिनेशन इलेक्शन / प्लॅनिंग असेम्बली

**रविवार १९ डिसेंबर**
ख्रिसमस पार्टी – डिंगणकर फार्म हाऊस, पानशेत

**२४ डिसेंबर**
सुट्टी

**३१ डिसेंबर**
सुट्टी

## R I News



Rotary International World Head Quarter - Indian flag specially hoisted at the entrance to honour President of Rotary Club of India.

**सिल्क रूट... आठवणींच्या वाटा**

आपल्या स्वत:च्या, आईच्या, आजीच्या काही साड्या असतात ज्या आपल्याला नेसता येत नाहीत कारण थोड्या जुन्या झालेल्या असतात, विरलेल्या असतात आणि कोणाला देऊन ही टाकवत नाहीत कारण त्याच्याशी काही आठवणी जोडलेल्या असतात... हाच विचार घेऊन सिल्क रूट येत आहे तुमच्या मदतीला. हा सिल्क रूट तुमच्याच जुन्या साड्यांचे रूप पालटून देईल, त्यापासून नव्या वस्तू तयार करेल आणि घेऊन जाईल तुम्हाला आठवणींच्या रस्त्याने तुमच्या मायेच्या माणसांजवळ...



**अधिक माहितीसाठी संपर्क सुवर्णरेखा देवधर : 8087947934**

पी. ई. रो. नितीन वाशिकर




जरा जरा गारवा जाणवू लागला... हवा हलकीशी धुकट होऊ लागली....
दिवाळीची चाहूल लागली... वर्ष-दीड वर्षाच्या करोना कारावासानंतरचा हा आनंदाचा सण...
भरभरून अनुभवायचा होता प्रत्येक क्षण....
खूप सारं प्लॅनिंग करता-करता अभ्यंगस्नानाची वेळ झाली... फराळ, फटाके, मित्रमैत्रिणी अन् आप्तेष्टांसह देवकृपेनं कुठलंही अवचित संकट न येता दिवाळी जोशात साजरी झाली....

दिवाळी खास होतीच... रोटरी क्लब ऑफ पुणे वेस्टएंडच्या दिवाळी पहाटनं ती खासमखास केली....
पहाटेची ताजी हवा... गार्डियन हॉलिडेज्‌ची गच्ची... स्वागताला सुंदर रांगोळी... पाण्यावर फुलांचा गालिचा अन् फुलांवर मिणमिणते दिवे.... सर्वाधिक उत्सुकता वैभव-सावनीला ऐकायची...
मैफील उगवतीबरोबर चढत गेली....
भानावर आल्यावर आनंद वाटण्याचा सोहळा...
रिचार्जेबल सोलर दिवे दिवाळी उजळण्यासाठी अन् मेडिकल किट्स समाजबंधूंचं आरोग्य जपण्यासाठी...
शैलेश-श्रद्धाच्या सुरेख दिवाळी गिफ्टबरोबरच सर्वांनी घेतला फराळाचा आस्वाद... अशी दिवाळी खऱ्या अर्थानं साजरी झाली....
दिवाळी पार्टीऐवजी साजरी झाली यंदा पहाट...!
या सगळ्या कल्पनेसाठी, नियोजनासाठी प्रेसिडेंट शैलेश आणि त्याच्या टीमचे आभार मानावे तितके थोडेच...



दिवाळीचा सण... आल्हाद पहाट...
आशाआकांक्षांचा... तेजोमय थाट...
नव्या नवेल्या ओंव्या लोब्यांची नवनिर्मिती.
आनंदाचा सण... नवी लगबग, नवा उत्साह
चैतन्य नवं, जुन्या नात्यांना नवी झळाळी...
नव्या क्षितिजावर नवतेची नवी हाळी
मित्रमंडळींच्या साक्षीनं... नव्या पर्वाची तेजोमय दिवाळी...
जोडीला शब्दवैभवाचा पूर अन् तलम सावनी सूर...



तुळशी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातल्या आंबवणे खुर्द धनगरवाडी इथल्या नागरिकांना 'रोटरी क्लब ऑफ पुणे वेस्टएंड अँड चॅरिटेबल ट्रस्ट'तर्फे सौर कंदील देण्यात आले. तसंच तोरणा राजगड न्यासाच्या वेल्हे इथल्या बारा आरोग्यरक्षकांना शंभर मेडिकल कीट प्रदान करण्यात आले.




Rtn.PE Nitin Washikar and Rtn. Vinita Washikar at PETS at Lonavala on 12, 13, 14 November 2021.



## आणि तारा उगवला...

शब्दांकन रो. आरती गोखले




१४ नोव्हेंबर २०२१ रोजी द रायझिंग स्टारच्या अंतिम फेरीसाठी मध्य, संपूर्ण महाराष्ट्रातून जवळपास २२०० स्पर्धक आले होते. त्यामधून पाच स्पर्धक सर्वोत्कृष्ट म्हणून विजेते ठरले.
ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ जयंत नारळीकर सर यांच्या त्र्याऐंशीव्या वाढदिवसाच्या निमित्तानं १९ जुलै २०२१ पासून रोटरी पुणे वेस्टएंडनं ऐंशी दिवसांची ॲस्ट्रोनॉमी या विषयावरची विनामूल्य ऑनलाईन कार्यशाळा मराठी विज्ञान परिषद पुणे यांच्या सहयोगानं आयोजित केली होती.
माहिती मार्गदर्शनसत्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २२०० स्पर्धकांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी पात्रफेरीसाठी जवळपास १२०० स्पर्धकांची निवड झाली. त्यांपैकी ७०० स्पर्धक पंधरा मिनटांची ऑनलाईन परीक्षा पूर्ण करू शकले. त्यांतून २०० स्पर्धकांची निवड प्रथम पायरीसाठी झाली. अशा एकूण चार पात्रता फेऱ्या घेण्यात आल्या आणि प्रत्येक फेरीतून फक्त उत्तीर्ण स्पर्धक पुढल्या फेरीत गेले. प्रत्येक फेरीसाठी अनेक ज्येष्ठ, नामवंत तज्ज्ञांचं मार्गदर्शन स्पर्धकांसाठी आयोजित करण्यात येत होतं. स्पर्धकांना अभ्यासासाठी किमान पंधरावीस दिवसांचा कालावधी देण्यात येत होता. ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. अजित केमभवी, डॉ. प्रमोद काळे आणि डॉ. ऋता काळे यांनी मार्गदर्शन केलं.
१४ नोव्हेंबर रोजी झालेल्या अंतिम फेरीत पस्तीस स्पर्धकांनी शोधप्रबंध सादर केले आणि अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून काम पाहणारे शास्त्रज्ञ लीना बोकील, हंसावनी यलगूर, सोनल सासवडकर यांच्यासाठी तीन विजेते निवडणं ही कसरत ठरल्यामुळे तीनऐवजी पाच विजेते निवडण्यात आले. हेच खरं सर्व स्पर्धकांचं यश....
महाराष्ट्रातल्या गोंदिया, अमरावती, यवतमाळ, विदर्भ, ठाणे, मुंबई अशा सर्व जिल्ह्यांमधून हे स्पर्धक सहभागी झाले होते.
प्रथम पाच विजेते
१. नारायणी देशपांडे २. निसर्गा सावे ३. आदित्य पटेल ४. राजस मुळ्ये ५. अस्मी जाधव



रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१च्या युथ डायरेक्टर रो. गौरी शिकारपूर आणि रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१च्या डीजीएन रो. मंजुषा फडके यांच्या हस्ते अंतिम फेरीमधल्या विजेत्यांना पारितोषिकं प्रदान केली. इतर स्पर्धकांना सर्टिफिकेट देण्यात आलं.
या प्रसंगी रोटरी वेस्टएंडचे सर्व रोटेरिअन उपस्थित होते. प्रेसिडेंट रो. शैलेश नांदुरकर आणि युथ डायरेक्टर रो. योगेश येवले यांच्या संकल्पनेतून साकार झालेली ही कार्यशाळा मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष रो. राजेंद्रकुमार सराफ, आर. आर. विनय, विवेक शिळीमकर, श्री. तातुकडे यांनी आणि अन्य सर्व सहकाऱ्यांनी यशस्वी केली.

## रोटरी पुणे वेस्टएंड युवा स्कॉलरशीप



१२ जानेवारी स्वामी विवेकानंद जयंती - राष्ट्रीय युवा दिवसाच्या निमित्तानं यंदाच्या वर्षी प्रथमच रोटरी पुणे वेस्टएंड युवा स्कॉलरशीप सुरू केली आहे. पुण्याच्या वैदेही सरोदे आणि श्रुतिका सरोदे या दोघींना राष्ट्रीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशीपसाठी ही स्कॉलरशीप डीजीएन रो. मंजुषा फडके आणि युथ डायरेक्टर रो. गौरी शिकारपूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

Anubhuti works with more than 600 farmers and has created employment for 25 people. Help us to create more employment by buying our products.




+91 85549 99925
anubhutisocialfoundation@gmail.com
www.anubhutisocialfoundation.org
STAY TUNED! THERE'S MORE TO COME!



## My Pan

*Raised bed gardening*
*By P.P. Rtn. Rajeev Dadhe*

Raised bed gardening involves use of beds that are above ground level. These beds are made by using wooden boards or any other material that will last long in open. The purpose is to create a special zone where you control the conditions. Some obvious benefits include



1 You can care for the bed without bending down. Easier for your back.
2 The soil remains soft as you are unlikely to step on it.
3 You can create a special type of growing medium as the native soil may not be ideal.
4 Water retention is avoided as water drains out.

I had seen such beds during my stay in New Zealand. While constructing our house at Panshet, I took special efforts to build six beds with bricks. Size of the beds should be such that you can cover entire surface without stretching. Our beds are of size 4' X 10'.

When filling the beds it is recommended to use good quality ingredients. Ideally fill bottom half with sticks and cuttings from your garden, topped with last years leaves. This mix will decompose over time and will give good biomass. It also creates favourable environment for earthworms. Fill top half with a mixture of top soil and compost.We used a mixture of top soil, cow dung manure and rice husk. Rice husk is available very cheap in season and keeps the mix light and earthy. It decomposes over time.

Our beds have been in use since last year and have given us ample harvest. The soil is very rich and soft, allowing good growth of vegetables below as well as above. We have harvested turnip, carrots, potato, sweet potato, harbhara, peas, chilly, tomato, brinjal, spinach, methi, corriander, shepu, basil, sweet corn and iceberg lettuce.

We have planted red lettuce, chilly, brinjal, basil and tomato. The list is growing every year. It's easy to get something to eat every day. The pleasure of eating things fresh from garden can only be experienced by gardners.
You all are welcome to visit us to know more.

## Readers View



शिवरायमय झालेलं एक ध्यासपर्व संपलं!
संपलं तरी कसं म्हणावं... ओजस्वी, लखलखते शब्द, महाराष्ट्र धर्माचा प्रखर अभिमान, सह्याद्रीवर अलोट प्रेम, इतिहासाचा गाढा अभ्यास, या सगळ्या रूपांत तुम्ही असणारच आहात...
महाराष्ट्राच्या, मराठी माणसाच्या मनामनांत....
पद्मविभूषण, महाराष्ट्रभूषण, पुण्यभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना श्रद्धांजली....

ऐकण्यासाठी क्लीक करा.

*Voice*
*Rtn. Nitin Kanetkar*

## Happy Birthday

२९ डिसेंबर - रो. योगेश येवले.
३० डिसेंबर - रो. स्वाती बेंद्रे



## Happy Anniversary

३ डिसेंबर - आदित्य आणि सुवर्णा देवधर
८ डिसेंबर - विराज आणि वैशाली कुकडे
१३ डिसेंबर - योगेश आणि शिल्पा येवले
१५ डिसेंबर - प्रकाश आणि नंदिनी डिंगणकर
१७ डिसेंबर - सचिन आणि नमिता कदम
१९ डिसेंबर - अनिल आणि गीता गोडबोले
२३ डिसेंबर - नीरज आणि स्वरूप बोरगांवकर
२४ डिसेंबर - राहूल आणि कविता अवस्थी

KAIVALYA RESORTS
Backwaters - Varasgaon

Spacious rooms,
beautiful view,
calming surroundings
& delious food for
you and your family!



